**नियमित दिवाणी दावा क्र.४२/२०२०**
**निशाणी क्र.४६ सोबत**

**उलटपास प्रतिवादी क्.१ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. आर शेळके यांचेमार्फत :-**

रावसाहेब बनसोडे यांचा शेती व दारू घरी तयार करण्याचा व्यवसाय होता. त्यांची पहिली पत्नी शशिकला बनसोडे वारण्यापुर्वीपासुनच हा त्यांचा व्यवसाय होता. हे म्हणणे खरे नाही की, रावसाहेब बनसोडे यांचा शेळया व मेंढया खरेदी व विक्रीचा व्यवसाय होता. त्यांच्या व्यवसायातुन रावसाहेबने ट्रॅक्टर खरेदी केले होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. रावसाहेब यांचेकडे त्याच्या मालकीचा ट्रॅक्टर होता किंवा कसे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, रावसाहेब हे त्यांच्या टॅक्ट्रने लोकांच्या शेतीची मशागत करून देत होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्.१ रावसाहेबांनी गट क्. ५६,५७,६० हा स्वत:च्या पैशाने खरेदी केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रावसाहेब लोकांच्या विहीरी खणुन देण्याचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, रावसाहेब यांनी पी.जे.एस.एस. या शाळेत शिक्षण घेतले. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, पहिली, दुसरी शिकले असतील. ७ वी पर्यंतचे शिक्षण प्रतिवादी क्. १ ने पी.जे.एस.एस. शाळेत घेतले किंवा कसे हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे मामा काकडीचे होते.

**प्रश्न:-** तुमच्या जन्माच्या आधीपासुन तुम्ही व आई शोभा काकडीला राहात होतात ?

**उत्तर:-** माझी आई वडीलांसोबत जाणेस तयार होती परंतु त्यांनी नेले नाही.

**प्रश्न:-** तुमच्या जन्मानंतर तुम्ही व आई पिंपळस येथे वडीलांकडे गेला नाहीत ?

**उत्तर:-** आम्ही जात होतो पण वडील घराबाहेर काढायचे. त्यामुळे माझे शिक्षण मामाकडे झाले.

हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण काकडीला मामाकडे झाले. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९१ पुर्वी माझी आई शोभा हिचे नाशिकचे गायकवाड यांच्याशी लग्न झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, चितळी येथील एका इसमाशी माझ्या आईचे सबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्.१ हे ख्रिश्चन आहेत.

**प्रश्न:-** प्रतिवादी क्.१ चा शाळेचा दाखला ख्रिश्चन आहे.

**उत्तर:-** त्यांची शाळा ख्रिश्चन होती.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्.१ व शोभा यांचे कोणतेही पती पत्नी

म्हणुन नाते अस्तित्वात राहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की, शोभा बनसोडे हया प्रतिवादी क्र. १ कडे कधीही पत्नी या नात्याने राहिल्या नाहीत. मी १२ वी झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ ची मुलगी नाही. हे म्हणणे खरे आहे की, रेखा हि प्रतिवादी क्र.१ व पहिली पत्नी शशिकला यांची मुलगी आहे. रेखाचे पती सिन्नर एम.आय.डी.सी.मध्ये चांगल्या उत्पन्नची नोकरी करतांत किंवा कसे हे मला माहीत नाही. गट क्र.५६ व ५७ हा १९९८ साली व गट क्र.६० सन १९९९ साली प्रतिवादी क्र.१ ने खरेदी घेतला किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील शोभा हि प्रतिवादी क्र.१ ची पत्नी असल्याचे खोटे दर्शविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, रावसाहेब व शोभाचा विवाह झालेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ व शोभा यांची मी मुलगी असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शोभा प्रतिवादी क्र.१ कडे कधीही राहायला नसल्याने तीला घराबाहेर काढण्याचा प्रश्न उदभवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा व शोभा यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबध नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी व प्रतिवादी क्र.१ ची एकत्र कुटुंबदारी असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५६,५७ व ६० मधील कोणतेही उत्पन्न मला प्रतिवादी क्र.१ ने दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१,२, ४ ते ९ यांच्याशी माझा कोणताही संबध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दखल केला.

उलटतपास पुर्ण

**प्रतिवादी नं २, ४ ते ९ तर्फे उलटतास विधीज्ञ श्री.व्ही.जी.आसणे यांचेतर्फे सुरूः-**

प्रतिवादी क्रं.१ तर्फे घेतलेला उलटतपास स्विकारला.

उलटतपास पूर्ण.

**उर्वरीत प्रतिवादींविरूदध उलटतपास नाही असा आदेश पारीत.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

दिनांक :- २६ / ८ /२०२४

(ए. ए. कुलकर्णी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
राहाता